ePaper

# तुम्ही पाण्यात बुडणारे दगड; मुख्यमंत्री शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना टोला



|वर्ष - 6 |अंक - 344 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- फुरसुंगी कचरा डेपोला आग
- 'काँग्रेसकडून मोदी सरकारला 'निषेध पत्रे'
- गजानन कीर्तिकर ,सुभाष देसाई आणि शिवसेना

www.mahaenews.com | सोमवार दि. 3 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## 'जॅकवेल' प्रकरणाच्या वादात राष्ट्रवादीचे

# आमदार अण्णा बनसोडे यांची 'शिष्टाई'!

### निविदेला तात्काळ मंजुरी द्या : आक्षेपांबाबत शहानिशा करून लेखी खुलासा करण्याची मागणी

**।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. पुढील ५० वर्षांचा विचार करुन शहरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने भामा-आसखेड प्रकल्पातून पाणी उचलण्यास मंजुरी मिळाली आहे. त्यासाठी धरणात जॅकवेल उभारण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता महापालिका प्रशासनाने निविदा प्रक्रिया राबवली आहे. मात्र, त्याबाबत काही आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. याबाबत शहानिशा करुन तात्काळ प्रक्रिया पूर्ण करावी, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी केली आहे.**





याबाबत आमदार बनसोडे यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना पत्र पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, शहरातील नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या पाणी संदर्भात कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता प्रशासनाने ही निविदा प्रक्रिया राबवली पाहिजे. निविदा प्रक्रियेतील सहभागी कंपनींच्या 'हिस्टरी रेकॉर्ड'बाबत काही आक्षेप आहेत. असे प्रसारमाध्यमांमधून समजले आहे. याबाबत महापालिका प्रशासनाने नि:पक्षपणे चौकशी करणे अपेक्षीत आहे. तसेच, कायदा विषयक सल्ला घेवून संबंधित निविदा प्रक्रिया तात्काळ राबवली पाहिजे.

निविदा प्रक्रिया कोणत्याही परिस्थितीमध्ये निरपेक्ष प्रणालीनुसार राबवली जावी. संबंधित प्रक्रियेवर घेण्यात आलेल्या आक्षेपांबाबत प्रशासनाने खुलासा करावा. सत्य-असत्य याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून मला लेखी स्वरुपात वस्तुस्थिती कळवावी, अशी सूचना आहे. तसेच, निविदा प्रक्रिया सदोष असेल, तर त्वरीत रद्द करावी आणि नियमानुसार योग्य असेल, तर तात्काळ निविदा प्रक्रिया पूर्ण करावी आणि कामाला सुरूवात करावी. कारण, हा पिंपरी-चिंचवडकरांच्या पाण्याचा प्रश्न आहे. या मुद्यावर कोणत्याही परिस्थितीत राजकारण होता कामा नये, अशी आमची ठाम भूमिका आहे, असेही आमदार बनसोडे यांनी म्हटले आहे.

### राजकीय दबावाला बळी पडू नका : बनसोडे



» तसेच, निविदा प्रक्रिया पूर्ण करीत असताना सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना वस्तुस्थितीचे अवलोकन करावे. ज्यामुळे कोणताही समज-गैरसमज राहणार नाही. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास शहराला अतिरिक्त १५६ एमएलडी पाणी मिळणार आहे. त्यामुळे पाणी समस्या सुटण्यास मदत होणार आहे. व्यापक जनहिताचा विचार करुन प्रशासनाने सकारात्मक भूमिकेतून कार्यवाही करावी. कोणत्याही राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा विचार करुन शहरातील नागरिकांना वेठीस धरू नये, अशी आग्रही मागणी आमदार बनसोडे यांनी केली आहे.

# आयुक्त म्हणतात... I AM HAPPY!

### बदलीबाबतच्या चर्चा निरर्थक : तीन वर्षांचा कार्यकाळ मिळाल्यास आनंद

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**माझ्या बदलीबाबत सातत्याने चर्चा केली जाते. कोण म्हणते माझी पत्नी दिल्लीत सनदी अधिकारी आहे. त्यामुळे मी बदलीसाठी इच्छुक आहे. असे काही नाही. माझी पत्नी सनदी अधिकारी नाही. मी बदलीसाठी इच्छुक नाही. तीन वर्षांचा कालावधी महापालिकेत पूर्ण करण्यास मिळाल्यास आनंद होईल, असे सांगत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी बदलीच्या चर्चेला पूर्णविराम दिला.**



राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने साताऱ्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी शेखर सिंह यांची १६ ऑगस्ट २०२२ रोजी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती केली. लोकप्रतिनिधी नसताना आयुक्तच प्रशासक झाले. मात्र, आयुक्त सिंह यांची कार्यपद्धती विरोधकांना रुचली नाही.

विरोधक सातत्याने आयुक्तांवर टीका करत आहेत. आयुक्त भाजपा आमदारांच्या कलाने काम करत असल्याचा आरोप आहे. आयुक्तांची नियुक्ती झाल्याच्या तीन महिन्यांतच खासदार श्रीरंग बारणे यांनीही मुख्यमंत्र्यांकडे आयुक्तांची तक्रार केली होती. त्यावेळीही आयुक्तांच्या बदलीची चर्चा झाली होती.

### शेवटी शासनाचा अधिकार...!

**»मागील काही दिवसांपासून पुन्हा आयुक्तांची बदली होणार, आयुक्त महापालिकेत कामकाज करण्यासाठी इच्छुक नसल्याची चर्चा सुरू झाली होती. याबाबत विचारले असता आयुक्त सिंह म्हणाले, माझ्या बदलीबाबत सातत्याने वेगवेगळी चर्चा केली जाते. कोण म्हणते माझी पत्नी दिल्लीत सनदी अधिकारी आहे. मी महापालिकेत काम करण्यास इच्छुक नसून बदलीसाठी प्रयत्न करत आहे. पण, असे काही नाही. माझी पत्नी सनदी अधिकारी नाही. मी बदलीसाठी इच्छुक नाही. माझी बहिण सांगलीला आयपीएस पोलीस अधिकारी आहे. बदली करण्याचा शासनाला अधिकार आहे. शासन जोपर्यंत ठेवेन तोपर्यंत काम करणार आहे. तीन वर्षांचा कालावधी महापालिकेत पूर्ण करण्यास मिळाल्यास आनंद होईल.**

# फुरसुंगी कचरा डेपोला आग!

## एका पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेल्या कचऱ्याला लागली आग

। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**फुरसुंगीतील कचरा डेपोतील कचऱ्याला आग लागल्याची घटना घडली. कचरा पेटल्यानंतर मोठ्या प्रमाणावर धूर निर्माण झाला होता. आगीमागचे कारण समजू शकले नाही. कचरा डेपोतील एका पत्र्याच्या शेडमध्ये ठेवलेल्या कचऱ्याला आग लागली. या घटनेची माहिती मिळताच हडपसर अग्निशमन केंद्रातील बंब घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली..**





कचऱ्यात प्लास्टिकच्या पिशव्या असतात. उन्हाळ्यात साठलेल्या कचऱ्यातील उष्णता वाढून आग लागण्याच्या घटना घडतात, असे महापालिकेचे आरोग्य सेवक सचिन चव्हाण यांनी सांगितले.या पूर्वी फुरसुंगीतील कचरा डेपोत आग लागण्याची घटना घडली होती. कचरा डेपोतील आग आटोक्यात आल्यानंतर कचरा धुमसत असतो. आग पूर्णपणे आटोक्यात येण्यास किमान एक ते दोन दिवस लागतात. कचऱ्यात ज्वलनशील वस्तू असतात. त्यामुळे आग आटोक्यात आणणे शक्य होत नाही. कचरा डेपोत यापूर्वी आग लागण्याच्या घटना घडल्यामुळे तेथे कायमस्वरुपी पाण्याचे टँकर ठेवण्यात आले आहेत .कचर्यामध्ये तयार होणारे गॅस उष्णतेमुळे पेट घेऊन आग लागत असते.असे महापालिकेचे वरिष्ठ आरोग्य सेवक सचिन चव्हाण यांनी सांगितले.कचरा डेपोतील चार आणि अग्निशामक दलाच्या तीन गाड्यानी लागलेली आग आटोक्यात आणण्यात यश आले. डेपोतील पाण्याच्या गाड्या जवळच उपलब्ध असल्याने आग आटोक्यात आणण्यास मदत झाली.धुराचे लोट मात्र दुरून दिसत होते.असे स्थानिक नागरिक संजय थोरात यांनी सांगितले.

# पुढचं सरकार हे शिंदे फडणवीस यांचं असणार: उद्योगमंत्री उदय सामंत



। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

मागील काही दिवसांपासून राहुल गांधी हे सातत्याने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्याबद्दल विधान करीत आहे. त्या विधाना बद्दल आजच्या सभेतून कोणी तरी भूमिका मांडली पाहिजे. त्यामुळे या सभेकडे सर्वांचे डोळे लागले असून सभेला कितीही गर्दी झाली. तरी पुढचं सरकार हे शिंदे फडणवीस यांचं असणार अशी भूमिका राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मांडत महा विकास आघाडीला त्यांनी टोला लगावला.

पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.छत्रपती संभाजीनगर येथे महाविकास आघाडीची सभा आयोजित करण्यात आली. त्या प्रश्नावर राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी भूमिका मांडली. यावेळी उदय सामंत म्हणाले की, एक महिन्यापुर्वी रत्नागिरी येथे सभा झाली.

लाखाच्या पुढे लोक सभेला आल्याच सांगण्यात आले आहे. तीन चार पक्षाचे कार्यकर्ते एकत्रित येऊन ते गर्दी करीत आहे. आपल्याकडील उर्वरित आमदार, कार्यकर्ते इकडे तिकडे जाऊ नये. त्याकरिता सभा आयोजित केल्या जात आहे. पण आम्ही त्यानंतर सभा घेऊन उत्तर दिले आहे.

मात्र आम्ही आता सभा घेणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील 2 लाख 88 हजार शेतकऱ्यांना पंजाबराव देशमुख व्याज सवलत!

## नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत अनुदान

। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत अनुदान योजनेचा लाभ देण्यात येत आहे. या व्याज सवलत योजनेचा 2022-23 या वर्षात पुणे जिल्ह्यातील 2 लाख 88 हजार 917 शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे. या सर्व शेतकऱ्यांच्या खात्यावर व्याज सवलतीपोटी 57 कोटी 31 लाख 77 हजार 25 रुपये जमा करण्यात आले आहेत.**



**तीन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर तीन टक्के व्याज सवलत**

डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत अनुदान योजनेचा शेतकऱ्यांना फायदा होत आहे. या व्याज सवलत योजनेमध्ये विहित मुदतीत अल्प मुदत पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून कर्जावर व्याज सवलत देण्यात येते. या योजनेमध्ये जे शेतकऱ्यांनी विहित मुदतीत कर्जाची परतफेड करतील त्यांना व्याज सवलत देण्यात येते. तीन लाख रुपयांपर्यंत अल्पमुदत कर्ज घेऊन विहीत मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन टक्के व्याज सवलत देण्याची डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना राज्य शासनामार्फत राबवण्यात येते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सर्व राष्ट्रीयकृत बँका, खासगी बँका, ग्रामीण बँकातून पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही योजना राबवण्यात येत आहे.

**व्याज सवलत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांकडून पीक कर्जाची मुदतीत परतफेड**

यामुळं शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आधुनिक कृषी निविष्ठा, बियाणे, खते, औषधे खरेदी करता येणार आहेत. यातून शेती उत्पादनात वाढ होणार आहे. तसेच व्याज सवलत मिळवण्यासाठी शेतकरी पीक कर्जाची मुदतीत परतफेड करत आहेत. त्यामुळं बँकांची वसुली वाढून आर्थिक परिस्थितीत सुधारणा होम्यास मदत होत आहे.

### शासनाकडून प्राप्त निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग

» या योजनेंतर्गत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (पुणे ग्रामीण) यांच्यामार्फत जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून प्राप्त तसेच शासनाकडून प्राप्त निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून 60 हजार 254 शेतकऱ्यांना 12 कोटी 91 लाख 69 हजार 939 रुपये आणि राज्य शासनाकडून प्राप्त निधीतून 2 लाख 28 हजार 663 शेतकऱ्यांना 44 कोटी 40 लाख 7 हजार 86 रुपये इतकी व्याज सवलतीची रक्कम अदा करण्यात आली आहे. याबाबतची माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (पुणे ग्रामीण) प्रकाश जगताप यांनी दिली आहे.

# काँग्रेसकडून मोदी सरकारला 'निषेध पत्रे'!

## » डॉ. कैलास कदम : राहुल गांधी यांचे खासदार पत्र रद्द करणे म्हणजे लोकशाहीचा खून

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचे खासदार पद रद्द करणे म्हणजे लोकशाहीचा गळा घोटून खून केल्यासारखे आहे असे प्रतिपादन डॉ. कैलास कदम यांनी केले. रविवारी पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली थेरगाव डांगे चौक येथे खासदार राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधी घोषणा देत काँग्रेस कार्यकर्त्यांनी निषेध केला.**




यावेळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना डॉ. कैलास कदम म्हणाले की, राहुल गांधी यांनी संसदेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अदानी यांच्या कंपनीत 20 हजार कोटी रुपये कुठून आले हा प्रश्न विचारला असता त्याचे उत्तर देण्याऐवजी सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी संसदेत गोंधळ घालून कामकाज तहकूब केले.

यानंतर अवघ्या काही तासात सुरत येथील कनिष्ठ न्यायालयाने खासदार राहुल गांधी यांचे रद्द केले याचा आधार घेत केंद्र सरकारने एकतर्फी निर्णय घेत राहुल गांधी यांचे खासदार पद रद्द केले. याविषयी तीव्र प्रतिक्रिया देशभर उमटत आहेत. शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात माजी महापौर कविचंद भाट, ज्येष्ठ नेते गौतम अरकडे, माजी नगरसेवक विश्वास गजरमल, महिला अध्यक्षा सायली नढे, युवक अध्यक्ष कौस्तुभ नवले, एनएसयुआय प्रदेश उपाध्यक्ष ॲड. उमेश खंदारे, वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष ज्ञानेश्वर मलशेट्टी, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, ग्राहक सेल अध्यक्ष झेवियर अंथोनी, रोजगार व स्वयंरोजगार अध्यक्ष विशाल सरवदे, मागासवर्गिय सेल अध्यक्ष विजय ओव्हाळ, सज्जी वर्की, डॉ. मनिषा गरुड, निर्मला खैरे, भारती घाग, सुनीता जाधव, सुवर्णा कदम, शितल सिकंदर आदिसह इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

### दैनंदिन प्रश्नांना फोडली वाचा...

» राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ शहर काँग्रेसच्या वतीने नाशिक फाटा येथे सह्यांची मोहीम सुरू आहे. चिंचवड थरमॅक्स चौक येथे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले आणि आज रविवारी डांगे चौक थेरगाव येथे जेल भरो आंदोलन करण्यात आले. या सर्व आंदोलनास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांच्या वतीने एक लाख पोस्ट कार्ड केंद्र सरकारचा निषेध करीत पंतप्रधान नरेंद्र मोदींना पाठवण्यात येणार आहेत. यामध्ये सद्य परिस्थितीत नागरिकांना भेडसवणारे प्रश्न महागाई, बेरोजगारी, इंधन दरवाढ याचा देखील उल्लेख करण्यात येणार आहे असेही काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी सांगितले.



# 'पीसीसीओईआर'च्या शिरपेचात मानाचा तुरा!

## »लक्षवेधी कामगिरी: इस्रोचा प्रथम क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट नोडल पुरस्कार प्रदान

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) या अभियांत्रिकी महविद्यालयाला भारत सरकार, अंतराळ विभाग, भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो), भारतीय सुदूर संवेदन संस्था ह्यांच्या वतीने देण्यात येणारा अखिल भारतीय स्थराचा मानाचा सर्वोत्कृष्ट असा भारतीय सुदूर संवेदन संस्था आय.आय.आर.एस. सर्वोत्कृष्ट नोडल केंद्र पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.**



२८ मार्च रोजी डेहराडून येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात डॉ. आर.पी. सिंग, संचालक, आय.आय.आर.एस., डॉ. कलाचंद सैन, संचालक, डब्लू.आय.एच.जी., डेहराडून, डॉ. रणजित सिन्हा, सचिव, आपत्ती व्यवस्थापन, उत्तराखंड सरकार, डॉ. एस.के. श्रीवास्तव, सी.जी.एम., आर.आर.एस.सी., एनआरएस.सी., नवी दिल्ली, डॉ. प्रमोद कुमार, डीन (शैक्षणिक), आय.आय.आर.एस. डेहराडून आदींच्या उपस्थितीत डॉ. सुदर्शन बोबडे यांनी पुरस्कार स्विकारला. पीसीइटीच्या सर्व शाखांमध्ये विद्यार्थी तसेच प्राध्यापकांना शिक्षण आणि संशोधनासाठी अनुकूल वातावरण आहे. ट्रस्ट नेहमी संशोधनासाठी भक्कम पाठबळ देत आहे. या पुरस्काराने पीसीओईआरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे अशी प्रतिक्रिया पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी डॉ. सुदर्शन बोबडे यांचे अभिनंदन करताना दिली. देशभरात कार्यरत असणाऱ्या ३२१४ दूरस्थ शिक्षण कार्यक्रम केंद्रांमधून पीसीसीईओआरची निवड करण्यात आली आहे. वर्ष २०२२ साठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांचे मोलाचे मार्गदर्शन : डॉ. बोबडे

»तसेच अखिल भारतीय स्थराचा मानाचा सर्वोत्कृष्ट भारतीय सुदूर संवेदन संस्था (IIRS) आउटरीच नेटवर्क समन्वयक हा पुरस्कार पीसीसीओईआरचे प्रा. डॉ. सुदर्शन बोबडे, सहयोगी प्राध्यापक व स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख, यांना देण्यात आला. हे पुरस्कार रिमोट सेन्सिंग अँड जीआयएस (RS & GIS) चा प्रचार समाजातील सर्व स्तरावर करून, समाज उपयोगी उपक्रमात सुदूर संवेदन व त्याचा वापर उत्कृष्टरित्या केल्या बद्दल, तसेच विद्यार्थ्यांसाठी भारतीय सुदूर संवेदन संस्थेचा (IIRS) दूरस्थ शिक्षण कार्यक्रम पोहचवण्या करिता देण्यात आला. पीसीइटीचे सर्व ट्रस्टी तसेच महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रेरणा, पाठबळ मिळाले असल्याचे डॉ. बोबडे यांनी सांगितले. विभागातील मीटर निरीक्षक, प्लंबर यांची मदत घेतली जाणार आहे.

यावेळी ओंकार भालेकर, साहिल साळवी व अक्षय राहणे यांची उपक्रमात साथ मिळाली. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव व्ही.एस. काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, उद्योजक अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीष देसाई यांनी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी यांचे विशेष कौतुक केले.

## संपादकीय »

### आरोग्य-हक्क कायद्याला विरोध नको

***राजस्थान सरकारने आणलेला आरोग्य-सेवा हक्काचा कायदा स्वागतार्ह आहे. पण त्याच्या विरोधात राजस्थानमधील डॉक्टरांनी आंदोलन सुरू केले आहे. तांत्रिकतेच्या पातळीवर सुधारणांसाठी 'आयएमए'ने जरूर आग्रही राहावे; पण त्याविरोधात उभे राहाणे अयोग्य आहे.***

राजस्थान सरकारने २१ मार्च रोजी 'आरोग्य-हक्क कायदा' आणला. राजस्थानमधील जनतेला तपासण्या, औषधे इत्यादींसकट सरकारी आरोग्य-सेवा मोफत मिळण्याचा हक्क त्यामार्फत मिळाला आहे. अपवाद वगळता या कायद्यातील सर्व तरतुदी सरकारी आरोग्य-सेवेसाठी आहेत. हा अपवाद म्हणजे- अपघात, सर्पदंश वा इतर प्राणीदंश यामुळे किंवा गरोदरपण, बाळंतपण यात गुंतागुंत होणे यामुळे तब्येत गंभीर झाल्यास पैशाची अट न घालता तातडीचे प्राथमिक उपचार देण्याचे बंधन खासगी डॉक्टरांवर घातले आहे. त्याच्या विरोधात राजस्थानमधील डॉक्टरांनी २७ मार्च रोजी राज्यव्यापी संप पुकारला.

इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए) देशभर २७ मार्च हा काळा दिवस म्हणून पाळला. हा निषेध नेमका कशासाठी हे 'आयएमए'च्या संकेत स्थळावर दिलेले नाही. 'आयएमए' सभासदांच्या व्हाटस-ॲप ग्रुपवर एका मेसेजमध्ये ही कारणे आहेत. त्यातील एक भीती म्हणजे या कायद्यामुळे "कोणताही रुग्ण रुग्णालयामध्ये येऊन माझी तब्येत गंभीर झाली आहे असे म्हणून मोफत उपचार मागेल". खरंतर 'तातडीची सेवा' याची स्पष्ट व्याख्या कायद्यात आहे. (राजस्थान विधानसभा संकेतस्थळ HTTPS://ASSEMBLY.RAJASTHAN.GOV.IN/LEGISLATIONGOVERNMENTBILLS.ASPX) त्यातून स्पष्ट होते की, फक्त वर दिलेल्या ठराविक तातडीच्या प्रसंगीच पैशाची अट न घालता तातडीचे प्राथमिक उपचार देण्याचे बंधन खासगी डॉक्टरांवर आहे. (या प्राथमिक उपचाराचे बिल रुग्णाने दिले नाही तर त्याची भरपाई करण्याचे बंधन सरकारवर आहे.) हृदय-विकाराचा झटका, अपेंडिक्सला सूज इत्यादींमुळे गंभीर परिस्थिती होणे अशा बाबतीत हे बंधन नाही. या मेसेजमध्ये असेही म्हटले आहे की, रुग्णाने याबाबत रुग्णालयाविरोधात तक्रार केली तर रुग्णालयाचा परवाना रद्द होऊ शकेल. पण रुग्णालयाचा परवाना रद्द होण्याची तरतूद या कायद्यात नाही; फक्त आर्थिक दंडाची तरतूद आहे. एखाद्या रुग्णाला एखादे रुग्णालय तातडीचे उपचार देऊ शकत नसेल तर त्या रुग्णालयाने रुग्णाला दुसऱ्या रुग्णालयामध्ये मोफत हलवले पाहिजे अशी तरतूद आहे. असे म्हणताना हे मांडलेले नाही की याचे बिल रुग्ण देऊ शकला नाही तर त्याची भरपाई सरकार करेल.



भाष्य

नितीन सावंत
91 9892514124



## गजानन कीर्तिकर ,सुभाष देसाई आणि शिवसेना

उद्धव ठाकरे यांचे निष्ठावंत सहकारी सुभाष देसाई यांचा मुलगा भूषण देसाई यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्याआहेत. सुभाष देसाई यांना तीन पुत्र आहेत त्यापैकी मोठा सभा सुबोध दुसरा प्रबोध आणि तिसरा भूषण. तिघांपैकी एकालाही राजकारणात अजिबात रस नाही त्यातल्या त्यात भूषण हा हुशार असल्याने सुभाष देसाई मंत्री असताना एमआयडीसीचा कारभार भूषणच पाहत असे. सुभाष देसाई सुद्धा काही व्यवहाराच्या गोष्टी असल्या की भूषणला भेटण्यास सांगत असत. भूषणचा पार्टनर गिरीश पवार त्याचे नरिमन पॉईंट येथे कार्यालय होते. या कार्यालयातूनच एमआयडीसीचे व्यवहार होत असत. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना दोनच लोक फॉर्ममध्ये होते. गिरीश पवार आणि प्रशांत निलेवार. गिरीश पवार हे सुभाष देसाई यांचे अर्थात भूषण देसाई चे विश्वासू सहकारी होते. एमआयडीसीचे अनेक व्यवहार गिरीश पवार यांच्या कार्यालयातून चालत. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनाही गिरीश पवार यांच्या कार्यालयात बोलावले जात असे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना गिरीश पवार हे अपॉइंटमेंट घेतल्याशिवाय भेटत नसत. एकवेळ सुभाष देसाई भेटतील परंतु गिरीश पवार भेटणार नाहीत. गिरीश पवारांचा शब्द म्हणजे भूषण देसाईचा शब्द.त्यामुळे एमआयडीसीचे अधिकारी गिरीश पवारांचा शब्द टाळत नसत. या गिरीश पवार यांच्यावर आयकर खात्याच्या धाडी पडल्या होत्या.त्याचवेळी प्रशांत नीलेवार यांनाही आयकर खात्याने जाळ्यात ओढले होते.गिरीश पवार फक्त सुभाष देसाई यांच्या मर्जीतील होते तर प्रशांत निलेवार हे तत्कालीन मंत्री बाळासाहेब थोरात,अशोक चव्हाण आणि एकनाथ शिंदे यांचे व्यवहार पाहत असत. निलेवार यांच्या कार्यालयात तर अशोक चव्हाण यांच्या खाजगी सचिवांना बदल्यांच्या फाईल घेऊन जावे लागत असे. निलेवार यांच्यावर धाडी पडल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या पक्ष सोडण्याच्या मोहिमेला वेग आला.मात्र एकनाथ शिंदे भाजप सोबत गेल्याने नीलेवार यांची चौकशी थांबली.त्यामुळे अर्थात बाळासाहेब थोरात आणि अशोक चव्हाण ही वाचले. सुभाष देसाई हे उद्धव ठाकरे यांचे अतिशय विश्वासू सहकारी असल्याने आता गिरीश पवार यांचा कार्यक्रम निश्चित होता.कोणत्याही क्षणी इडी त्यांना अटक करु शकत होती.यातूनच मार्ग काढण्यासाठी सुभाष देसाई यांच्या सल्ल्यानेच भूषण देसाई यांचा प्रवेश झाला आहे. परंतु यामुळे देसाई आणि त्यांच्या समर्थकांचे मातोश्री वरील वजन नक्की घटले आहे. खासदार गजानन किर्तीकर यांनी शिंदे सेनेत प्रवेश केल्यानंतर त्यांचा मुलगा अमोल किर्तीकर हा उध्दव यांच्यासोबत राहिला.ही गोष्ट सुभाष देसाई आणि त्यांच्या गोरेगावात चमच्याना खटकत होती.मातोश्री ची अमोल यांच्यासोबत ची वागणूक ही बदलली.अमोल ला पर्याय म्हणून कॉंग्रेस-भाजप मार्गे आलेले समीर देसाई यांना आदित्य ठाकरे यांच्या सोबत नेण्याचा प्रयोग देसाई यांनीच केला.अमोल किर्तीकर कधी शिंदे सेनेत जाणार?अशी कुजबूज देसाई यांच्या समर्थकांनी सुरु केली.पण नियती कुणालाच सोडत नाही.आता भूषण देसाई यांनी शिंदे सेनेत का प्रवेश केला? हे सर्वश्रुत आहे. भूषण यांनी शिंदे सेनेत प्रवेश केला नसता तर गिरीश पवार यांना अटक निश्चित होती.त्यानंतर भूषण देसाई यांचा नंबर होता.अर्थात त्यामुळे स्वतः सुभाष देसाई अडचणीत सापडणार होते. पण भूषण यांच्या प्रवेशाने आता तूर्त त्यांना दिलासा मिळाला आहे.पण आता गोरेगावात सुभाष देसाई कधी शिंदे सेनेत जाणार अशी चर्चा देसाई विरोधकांनी सुरु केली आहे.

## वीजेवरील अन्याय ग्राहकांनी करावा दूर

**आपल्याकडे कोणत्याही सार्वजनिक सेवांबाबत कमालीची अनास्था दिसून येते. रेल्वे, बस असो अथवा वीज. अनेक प्रसंगांमध्ये सार्वजनिक रुग्णालये किंवा पोस्टाची कार्यालये. अजस्त्र अशा लोकसंख्येला अखंडित सेवा पुरविणाऱ्या या सर्वच संस्थांकडे आत्मियतेने पाहण्याची गरज आहे.**

पाणी आणि वीज या तर अतिमुलभूत गरजा. पाण्याचा अनावश्यक वापर आणि अपव्यय करणे टाळले तरी पाण्याचे संकट बऱ्याच अंशी दूर होऊ शकते. वीजेच्या संदर्भात देखील हीच बाब लागू आहे. वीज मंडळ हे देखील असेच अनास्थेचे केंद्र आहे. किंबहुना वीज मंडळ हे सगळ्या जनतेसाठी सॉफ्ट टार्गेट ठरते.

वीज फुकट मिळावी, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणारी मंडळी खोऱ्याने आढळतात. वीज मीटरमध्ये फेरफार करुन बिल रोखण्यासाठी शक्कल लढविणाऱ्यांचीही कमी नाही. कितीही मीटर बदलले, अत्याधुनिक झाले तरी त्यातही वीज चोरीचा मार्ग काढणारे रॅन्चो आपल्याकडे आढळून येतात. काही विशिष्ट भागांमध्ये अजूनही आकडे टाकून वीज चोरी होते.

जी सेवा आपल्याला अत्यावश्यक आहे. त्या सेवेसाठी नेमून दिलेले शुल्क द्यायला खरंतर काहीही



अडचण असण्याचे कारण नाही. महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्यात विनाखंड वीज उपलब्ध होते, ही आपली जमेची बाजू आहे. शहरी भागातील ग्राहकांवर थकबाकी असलेल्या आणि खासकरुन ग्रामीण भागातील ग्राहकांचा बोजा पडतो, असं म्हणणं योग्य ठरणार नाही.

ती लोक बिलं वेळेवर देत नाहीत, मग आम्हीच का द्यायची हा युक्तिवादही पूर्णतः अयोग्य आहे. त्यात जेव्हा वीज दरवाढ होते, तेव्हा तर वीज खात्यावर टीकेचा भडीमार होतो. वाढीव वीज दराचा बोजा हा सर्वस्वी ग्राहकांवर पडणार असला तरीदेखील वीज मंडळाची वस्तुस्थिती समजून घेतल्यावर वाढीव दर सोशीक जनता निश्चित समजून घेऊ शकेल. वाढीव वीजदराबाबत अजून एक गोष्ट प्रकर्षाने मांडायला हवी. पेट्रोल, डिझेलचे दर वाढतात, तेव्हा त्याची कुठलीही सुनावणी होत नाही. हे दर थेट वाढतात. अर्थसंकल्पामध्ये शासकीय बस आणि रेल्वेची दरवाढ होते, तेव्हाही जनतेकडे विरोधाचे कोणतेही हत्यार नसते.

गॅस दरवाढ होते, तेव्हाही ते निमूटपणे सहन करण्यापलीकडे अन्य मार्ग नसतो. सामान्य जनता या विषयांसाठी रस्त्यावर येत नाही. अगदीच नाकेनऊ आले तर मतपेटीतून जनता त्यांचे निर्णय देत आलेली आहे.

वीज दरवाढीचे अधिकार वीज मंडळाकडे नाहीत. सगळ्या खर्चाचा आणि उत्पन्नाचा तपशील सादर केल्यानंतर एमईआरसी दरवाढीला मान्यता देते. दरवाढीनंतर त्यास आक्षेप घेण्याची देखील मुभा असते.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# उद्धव ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल!

## हिंदूंचा नेता पंतप्रधान झाल्यानंतरही हिंदूंना आक्रोश करावा लागतोय

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आज महाविकास आघाडीची एकत्रित सभा होत असून, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे (UDDHAV THACKERAY) यांनी भाषणाच्या सुरवातीलाच भाजपवर निशाणा साधला. सध्या अनेक ठिकाणी हिंदू आक्रोश मोर्चा काढला जात आहे. पण हिंदूंचा नेता पंतप्रधान झाल्यानंतरही हिंदूंना आक्रोश करावा लागतोय, असा खोचक टोला उद्धव ठाकरे यांनी भाजपला लगावला आहे.**



दरम्यान यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर शहरात सभेला कधीही गर्दीचा दुष्काळ दिसला नाही. नेहमी गर्दीचा पूर पाहायला मिळतो. याच मैदानावरून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शहराचे नाव संभाजीनगर करण्याची घोषणा केली होती. यापूर्वी आम्ही भाजपसोबत असताना शहराचे नाव बदललेलं नाही, पण महाविकास आघाडी सरकारच्या काळात नामांतराचा निर्णय झाला.

**सभेला तीनही पक्षाचे कार्यकर्ते...**

छत्रपती संभाजीनगर शहरात महाविकास आघाडीच्या तीनही पक्षाची एकत्रित सभा होत आहे. या सभेत ठाकरे गटासह राष्ट्रवादी, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्याप्रमाणावर सभेत उपस्थित असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान सभेला मोठ्याप्रमाणावर गर्दी झाली असून, मैदानात जागा नसल्याने नागरिक बाहेर रस्त्यावर उभे राहून उद्धव ठाकरे यांचे भाषण आयकत असल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच सभेच्या परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त देखील पाहायला मिळत आहे.

### ठिकठिकाणी वाहतूक कोंडी...

**महाविकास आघाडीच्या तीनही पक्षाची एकत्रित सभा छत्रपती संभाजीनगर शहरातील मराठवाडा सांस्कृतीक मंडळाच्या मैदानात होत आहे. दरम्यान सभेसाठी मराठवाड्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील नागरिक सभेसाठी शहरात आल्याने याचा परिणाम वाहतुकीवर होताना पाहायला मिळत आहे. तर सभापरिसरातील अनेक चौकात वाहतूक कोंडी पाहायला मिळत आहे. निराला बाजार आणि खडकेश्वर, फुले चौकसह अनेक चौकात वाहतूक कोंडी पाहायला मिळत आहे.**

### सभेला महिलांची मोठी गर्दी...

**महाविकास आघाडीच्या सभेत महिलांची देखील मोठ्याप्रमाणावर गर्दी पाहायला मिळत आहे. तर महागाई, गॅस सिलेंडरचे वाढलेले दर याचा नेत्यांच्या भाषणात उल्लेख करण्यात आला आहे. केवळ बस भाड्यात 50 टक्के सवलत देऊन महिलांचे प्रश्न मिटत नाही, महिलांच्या इतरही प्रश्नांकडं सरकारने लक्ष द्यायल पाहिजे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी आम्ही सभेला आलो असल्याची प्रतिक्रिया सभेला आलेल्या महिलांनी दिल आहे.**

### सावरकर गौरव यात्रेत मुख्यमंत्र्यांसह आशिष शेलारांचा मविआवर हल्लाबोल

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज (2 एप्रिल) ठाणे शहरातून वीर सावरकर गौरव यात्रेला प्रारंभ झाला. सावरकर यांच्या गौरवासाठी काढण्यात आलेल्या गौरव यात्रेत मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. भाजप आणि शिंदे गटाच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने गेल्या महिन्यात सावरकरांच्या दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यासाठी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या त्यांच्यावरील वक्तव्याचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात सावरकर गौरव यात्रा काढण्याची घोषणा केली होती.

मी सावरकर संदेश असलेल्या भगव्या टोप्या घालून लोक गौरव यात्रेत सहभागी झाले होते. ठाणे शहरातील राम गणेश गडकरी रंगायतन सभागृहात मुख्यमंत्र्यांनी सावरकरांना पुष्पहार अर्पण केला. येथून यात्रा सुरु झाली. शिंदे यांच्यासह सत्ताधारी शिवसेना-भाजप युतीचे नेतेही यात्रेत सहभागी झाले होते.



# अदानींच्या कंपनीतील २० हजार कोटी कोणाचे?

## थोरातांचा भाजपवर जोरदार हल्लाबोल

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



छत्रपती संभाजीनगर - महाविकास आघाडीच्या वतीने आज छत्रपती संभाजीनगरमध्ये वज्रमुठ सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. तिन्ही पक्षांनी मिळून ही सभा आयोजित केल्यामुळे या सभेकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. या वेळी काँग्रेसनेते बाळासाहेब थोरात यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला.

थोरात म्हणाले की, आम्ही कोरोनाच्या अडीच वर्षांच्या काळात उद्धव ठाकरे यांच्यात नेतृत्वात राज्याचा विकास कमी होऊ दिला नाही. मात्र आताचं सरकार काय करत हे सांगायची गरज नाही. मात्र केंद्र सरकार विरोधात बोलणाऱ्यांमागे ईडी लावतं. सीबीआयची भीती दाखवतं.

दरम्यान राहुल गांधी भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून संपूर्ण देशात फिरले. राहुल गांधींनी सभागृहात प्रश्न विचारला. त्यावर त्यांना बोलू दिलं नाही. राहुलजी परदेशात गेले असताना त्यांच्यावर आरोप करण्यात आले. राहुलजींची सदस्यता काढून घेण्यात आले. त्यामुळे लोकशाहीची अवस्था काय आहे, न बोललेच बर, असंही थोरात म्हणाले.राहुलजी यांनी एकच प्रश्न विचारला, की अदानींच्या खात्यात २० हजार कोटी रुपये कुठून आले, मात्र त्यावर उत्तर द्यायला सरकार तयार नाही. मात्र जनतेला सगळ कळायला लागलं आहे, असंही थोरात म्हणाले.

# गडकरींना जुन्या घरी परतायचेय, पण रस्ताच बांधून होईना!

## मी देशभरात रस्ते बांधतो अन.., अशी खंत नितीन गडकरी यांनी व्यक्त केली

। नागपूर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिल्ली-मुंबई हा १ लाख कोटीचा रस्ता बांधला. मात्र, २ किलोमीटर असलेला केळीबाग रस्ता अजूनही पूर्ण करू शकलो नाही, अशी खंत व्यक्त करीत मला महालमध्ये लवकर राहायला यायचे आहे. त्यापूर्वी हा रस्ता तयार करा, असे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.**



महापालिकेच्या वतीने चिटणवीसपुरा येथे २ कोटी १४ लाख रुपये खर्चून आधुनिक सोयी सुविधांनी युक्त अशा राजर्षी छत्रपती शाहू महाराज ई-ग्रंथालयाचे लोकार्पण गडकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार विकास कुंभारे, मोहन मते, प्रवीण दटके, माजी महापौर दयाशंकर तिवारी, आयुक्त राधाकृष्णन बी. यांच्यासह महापालिकेचे पदाधिकारी उपस्थित होते. नागनदीसाठी २४०० कोटींची योजना तयार करण्यात आली आहे. पाण्यासाठी ३२ टाक्या बांधण्यात येणार असून, त्यातील अनेक मार्चच्या आत पूर्ण होतील, असेही गडकरी म्हणाले.

### मद्यपींकडे लक्ष ठेवा

**अत्याधुनिक साधनांनी ई वाचनालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्राची निर्मिती करण्यात आली. मात्र यात मद्यसेवन करणाऱ्यांना प्रवेश देऊ नका. कारण या भागात मद्य सेवन करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. नाही तर वातानुकुलीत व्यवस्था आहे म्हणून अनेक जण मद्य घेऊन येतील व ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विरंगुळा केंद्रात आराम करतील. त्यामुळे याकडे अधिक लक्ष द्यावे, असेही गडकरी म्हणाले.**

# पश्चिम बंगालमध्ये पुन्हा हिंसाचार !

## पश्चिम बंगालमधील हुगळी येथील रिश्रा परिसरात 'शोभा यात्रे'दरम्यान हिंसाचार आणि जाळपोळ

।नवी दिल्ली महाईन्यूज।

**रामनवमीच्या दिवशी पश्चिम बंगालमधील हावडा येथे हिंसाचाराची घटना घडली होती. यावेळी दोन गटांनी एकमेंकावर दगडफेक करत पोलिसांच्या वाहनांना आग लावली . संतप्त जमावाने काही खासगी वाहनांनाही आगीच्या भक्ष्यस्थानी केलं. रामनवमीच्या दिवशी घडलेली ही घटना ताजी असताना आता पुन्हा एकदा पश्चिम बंगालमध्ये हिंसाचार उसळला आहे.**



रविवारी पश्चिम बंगालमधील हुगळी येथील रिश्रा परिसरात भारतीय जनता पार्टीच्या 'शोभा यात्रे'दरम्यान हिंसाचार आणि जाळपोळ झाली. यावेळी दगडफेक झाल्याचीही माहिती मिळाली आहे. पश्चिम बंगालमधील भाजपाचे उपाध्यक्ष दिलीप घोष हे या 'शोभा यात्रे'चं नेतृत्व करत होते. यावेळी काही समाजकंठकांनी गोंधळ घातला. ही शोभा यात्रा भाजपा, विश्व हिंदू परिषद (VHP) आणि इतर काही हिंदू संघटनांनी आयोजित केली होती.

या हल्ल्यात आमदार विमन घोष जखमी झाल्याचा दावा भाजपाने केला आहे. या घटनेची माहिती मिळताच चंदननगरचे पोलीस आयुक्त अमित जबलगीर यांनी अतिरिक्त पोलीस फौजफाटा घेऊन घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी प्रतिक्रिया देताना तृणमूल काँग्रेसचे प्रवक्ते कुणाल घोष म्हणाले, "आज हुगळी येथे जो प्रकार घडला आहे, तो हावडा येथे घडलेल्या हिंसाचाराप्रमाणेच आहे. भाजपा पूर्वनियोजित पद्धतीने दंगल भडकवण्याचा प्रयत्न करत आहे."

### रामनवमी हिंसाचार

» रामनवमीच्या दिवशी हावडा येथे हिंसाचाराची घटना घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी एकूण ३८ जणांना अटक केली आहे. या हिंसाचारात अनेक दुकानांची तोडफोड करण्यात आली होती. तसेच काही पोलिसांच्या वाहनांसह अनेक खासगी गाड्या जाळण्यात आल्या होत्या.



# देशात कोरोनाची चौथी लाट?

## गेल्या 24 तासांत सातत्याने वाढतेय रुग्णसंख्या

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील अनेक भागामध्ये पुन्हा एकदा कोरोनाने थैमान घालायला सुरुवात केली आहे. कोरोना बाधित रुग्णांची संख्या पुन्हा एकदा झपाट्याने वाढू लागली आहे. मागील चार महिन्यांनंतर, शनिवारी देशात कोरोनाची 2,994 नवीन प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत, तर सक्रिय रुग्णांची संख्या 16,354 झाली. त्यामुळे आता लोकांना कोरोनाच्या चौथ्या लाटेची भीती वाटू लागली आहे.**

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, संसर्गाच्या नवीन प्रकरणांसह भारतात कोविड -19 प्रकरणांची संख्या 4.47 कोटी झाली आहे. दरम्यान, 9 जणांचा मृत्यू झाला असून मृतांची संख्या 5,30,876 झाली आहे.

कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे दिल्ली, कर्नाटक आणि पंजाबमध्ये प्रत्येकी दोन मृत्यू झाले आहेत. गुजरातमध्ये एक आणि केरळमध्ये दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. कोरोनाची 16,354 सक्रिय प्रकरणे आहेत, जी संसर्गाच्या एकूण प्रकरणांच्या 0.04 टक्के आहेत.

आरोग्य मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, कोविड-19 मधून बरे होण्याचा राष्ट्रीय दर 98.77 टक्के आहे. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, रोजचा पॉझिटिव्हिटी रेट 2.09 टक्के आणि आठवड्याचा 2.03 टक्के नोंदवला गेला आहे.दिल्लीमध्ये शनिवारी कोरोना विषाणूच्या संसर्गाची 416 नवीन प्रकरणे समोर आली आहेत, तर संसर्ग दर 14.37 टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्या सात महिन्यांतील एका दिवसातील ही सर्वाधिक प्रकरणे आहेत. आरोग्य विभागाने शेअर केलेल्या आकडेवारीवरून ही माहिती समोर आली आहे.



### 7 महिन्यांतील एका दिवसातील ही सर्वाधिक प्रकरणे

» आरोग्य मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, कोविड-19 मधून बरे होण्याचा राष्ट्रीय दर 98.77 टक्के आहे. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, रोजचा पॉझिटिव्हिटी रेट 2.09 टक्के आणि आठवड्याचा 2.03 टक्के नोंदवला गेला आहे.दिल्लीमध्ये शनिवारी कोरोना विषाणूच्या संसर्गाची 416 नवीन प्रकरणे समोर आली आहेत, तर संसर्ग दर 14.37 टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्या सात महिन्यांतील एका दिवसातील ही सर्वाधिक प्रकरणे आहेत.

# अमित शहा यांचा दौरा रद्द

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

रामनवमीच्या दिवशी बिहारमध्ये झालेल्या धार्मिक तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सासारामचा दौरा रद्द केला. भाजपचे बिहारचे प्रदेशाध्यक्ष सम्राट चौधरी यांनी पक्ष कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. धार्मिक तणावामुळे सासाराम जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश जारी होऊन जमावबंदी लागू झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

रामनवमी उत्सवादरम्यान देशात अनेक ठिकाणी धार्मिक तणाव आणि दंगलीच्या घटना घडल्या. बिहारमधील सासाराम आणि बिहार शरीफ या ठिकाणी धार्मिक तणाव निर्माण झाला. त्यामुळे राज्य सरकारने



### बिहारमधील सासाराममध्ये धार्मिक तणाव

सासाराम जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले. त्या पार्श्वभूमीवर शहा यांनी सासारामचा दौरा रद्द केला. तिथे ते सम्राट अशोकाच्या जयंती सोहळ्याला उपस्थित राहणार होते. मात्र, त्यांचा उर्वरित बिहार दौरा पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे होणार आहे असे चौधरी यांनी सांगितले. रविवारी त्यांची नवाडा येथे जाहीर सभा होणार आहे असे पक्षातर्फे सांगण्यात आले. अमित शहा यांचा कार्यक्रम रद्द झाल्याबद्दल चौधरी यांनी राज्य सरकारला जबाबदार ठरवले. परिणाम हिमालयात राहणाऱ्या लोकांच्या उपजीविकेवर तसेच नदीकाठच्या लोकसंख्येवरही होऊ शकतो. जैवविविधता संवर्धन आणि हिमालयाच्या परिसंस्था सेवेवरही हिमनद्या वितळण्यामुळे नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

# मला आंधळा, वेडा नवरा हवा! सारा असं का म्हणाली?'

बॉलीवूडमध्ये आपल्या बोल्डनेसनं सगळ्यांचे लक्ष वेधून घेणारी सारा आता लग्नाच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे. सध्या तिचा गॅसलाईट नावाचा चित्रपट चर्चेत आला आहे. गेल्या काही दिवसांपासून सारा तिच्या चांगल्या हिट चित्रपटाच्या शोधात आहे. यापूर्वी तिच्या प्रदर्शित झालेल्या चित्रपटांनी प्रेक्षकांची नाराजी ओढावून घेतली आहे.

सारा आता २७ वर्षांची आहे. त्यात तिच्या लग्नाची चर्चा सुरु असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. प्रसिद्ध अभिनेत्री शहनाज गिलनं सारा अली खानची मुलाखत घेतली असून त्यामध्ये तिनं तिच्या लग्नाविषयी खुलासा केला आहे.यातून साराच्या चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. सारानं जी प्रतिक्रिया दिली त्यावरुन तिच्यावर नेटकऱ्यांनी टीका सुरु केली आहे. सारा अली खान असं कसं बोलू शकते. असे नेटकऱ्यांनी म्हटले आहे. लग्नं कधी करणार, यावर काय बोलून गेली सारा अली खान-



शहनाज गिलनं सारा अली खानला शेवटी तो प्रश्न विचारला ज्यावरुन अनेकजण तिच्या उत्तराची आतुरतेनं वाट पाहत आहेत. तुझ्या लग्नाचे प्लॅनिंग काय आहे यावर सारा म्हणाली, मी अजुन त्याचा काही विचार केलेला नाही. पण आता मला असा एखादा आंधळा नाहीतर वेडा माणूस शोधावा लागेल जो माझ्याशी लग्न करायला तयार असेल. सध्यातरी माझा शोध सुरु आहे. अशी प्रतिक्रिया सारानं दिली होती.

# महिन्याला 500 रुपये कमावणारा आज 300 कोटींचा मालक!

**टीव्ही मनोरंजन विश्वामध्ये आज त्याचे नाव मोठ्या आदरानं घेतले जाते. मध्यमवर्गीय कुटूंबातून आलेला तो, त्यानं बघता बघता बॉलीवूडमधील सगळ्याच सेलिब्रेटींच्या मुलाखती घेऊन त्यांना बोलते केले. अजुनही त्याला म्हणावं असं फाडफाड इंग्लिश बोलता येत नसेल पण, तो भल्या भल्या सेलिब्रेटीपेक्षा चांगली कमाई करत असल्याचे दिसून आले आहे.**



कपिल शर्मा विषयी जेवढं बोलावं तेवढं कमी आहे. तो कमालीचा हुशार अभिनेता आहे. नाही म्हटलं तरी त्याचे दोन - तीन चित्रपट प्रदर्शित झाले. टीव्ही मनोरंजन विश्वात काम करताना बॉलीवूडमध्ये देखील पाऊल ठेवण्याची आगळी वेगळी किमया कपिलनं करुन दाखवली आहे. त्यामुळे त्याच्यावर नेहमीच चाहते खुश असतात. आज त्याचा जन्मदिवस आहे. त्यानिमित्तानं त्याच्याविषयीच्या वेगवेगळ्या गोष्टीं सोशल मीडियावर व्हायरल झाल्या आहेत.कपिलचा प्रवास, त्याचा संघर्ष, त्याचे वैयक्तिक आयुष्य, त्याच्या आयुष्यातील प्रेरणादायी गोष्टी, किस्से आणि व्यक्ती याविषयीच्या अनेक गोष्टी व्हायरल होत असून त्यामध्ये कपिलची पहिली कमाई आणि आता तो कोट्यवधी संपत्तीचा झालेला मालक या घटनेविषयी चाहते जाणून घेण्यासाठी चाहते कमालीचे उत्सुक असल्याचे दिसून आले आहे. एका मुलाखतीमध्ये कपिलनं त्याच्या अनेक नोकऱ्यांविषयी सांगितले होते. आज कपिलच्या संपत्तीचा आकडा ऐकून भोवळ आल्याशिवाय राहणार नाही.कोणे एकेकाळी कपिलची कमाई होती केवळ महिना पाचशे रुपये एवढी. आता त्याच्याकडे तीनशे कोटी रुपयांची संपत्ती आहे. कपिल शर्मा त्याच्याच नावानं एक शोमध्ये दिसतो. तो चित्रपटांचे ब्रँडिंग करतो. तो सोशल मीडियावरुन अमाप पैसे कमावतो. तो निर्माता आहे. तो सोशल मीडिया इन्फ्लुंसर देखील आहे. अशा वेगवेगळ्या माध्यमातून कपिलनं पैसे कमावले आहे. अजुनही या क्षेत्रामध्ये तो सक्रिय असल्याचे दिसून आले आहे.

# तुमच्या-आमच्यातल्या भाऊरावांचा महात्त्वाकांक्षी "टीडीएम" येतोय..

**या जगात पारंपारिक चौकटीत राहून आपले जीवन सामन्यांप्रमाणे जगणाऱ्या अनेक लोकांचा भरणा असला तरीही त्या चौकटींची मोडतोड करण्याचं, व्यवस्थेविरोधात बंड करण्याचं, परिस्थितीला जिंकण्याचं धाडस, अंगी वेड असलेली माणसंच करू शकतात. मराठी सिनेमा दिग्दर्शक भाऊराव नानासाहेब कऱ्हाडे तळागाळातून आलेला असाच सृजनाचं वेड जपणारा तरुण आहे...**

सिनेमातलं क, ख ही ज्याला माहित नव्हतं असा भाऊराव आज मराठी सिनेसृष्टीतील सर्वात प्रतिभाशाली दिग्दर्शकांपैकी एक आहे. आपल्या पहिल्याच सिनेमात त्यानं जीव ओतला आणि भाऊचं नाव देशभरात गाजलं . आज दिग्दर्शक नागराज मंजुळेच्याही पुढं जाण्याची ताकद भाऊमध्ये आहे, असं म्हटलं जातं. त्यामुळे भाऊ नेहमीच माध्यमांमध्ये चर्चेत असतो. मात्र हा भाऊ नेमका कुठून आला आणि त्याच्यात असं काय आहे ज्यामुळे तो इतरांपेक्षा वेगळा ठरतो, याबद्दल सविस्तर माहिती देणारा हा व्हिडिओ... त्यामुळे व्हिडिओ शेवटपर्यंत नक्की पाहा..

भाऊराव हा सामान्य शेतकरी कुटुंबातील पोरगा, अहमदनगर जिल्ह्यातील शिरूर गव्हाणवाडी या छोट्याशा खेड्यातला त्याचा जन्म. भाऊरावला लहानपणापासूनच शिक्षणाची फारशी गोडी नव्हती, पण त्याला वाचायला खूप आवडायचं. हातात येईल ते पुस्तक वाचायचं. कात्रणं वाचायची. गुरं-ढोरं चरायला नेतानाही भाऊरावच्या हातात पुस्तक असायचचं. पुस्तक वाचण्याबरोबरच भाऊरावचा दुसरा छंद म्हणजे चित्रपट पाहणे. भाऊच्या आयुष्यात त्यानं बघितलेला पहिला चित्रपट 'मैने प्यार किया'. त्या वेळी भाऊ सहा-सात वर्षांचा होता. त्याच्या गावात एकाच घरात टीव्ही होता. तिथं दर रविवारी मराठी चित्रपट असायचे. ते बघायला मिळावे, म्हणून भाऊ रविवारची आतुरतेनं वाट बघायचा. त्या वेळी व्हिडिओ आणि प्रोजेक्टरवर त्याच्या गावात चित्रपट यायचे. तेही चित्रपट भाऊ न चुकता बघायचा. याच काळात चित्रपट निर्मितीबाबतचा एक लेख त्याच्या वाचनात आला. त्यानंतर त्याला चित्रपटाचा नायक होण्यापेक्षा दिग्दर्शक व्हावं, असं वाटू लागलं. चित्रपट निर्मितीचं बीज याच वेळी त्याच्या मनात रुजलं.

पण चित्रपट कसा बनवायचा हे त्याला उमजत नव्हतं. कॉलेज सुरू होतं, याच दरम्यान त्याला समजलं, पुण्याला, 'एफटीआयआय' नावाची संस्था आहे. पण त्याच्यासाठी पुणेही तेव्हा खूप दूर असण्याचे दिवस होते. पुण्याला जायचं मनात होतं, पण योग येत नव्हता. एक दिवस शेतात पिकलेल्या कांद्याची विक्री करण्याच्या निमित्ताने गाडीसोबत पुण्याच्या मार्केट यार्डमध्ये तो आला. तिथून चालत 'एफटीआयआय'च्या पत्त्यावर पोहोचला. चौकशी केली. समजलं, इथं प्रवेश घ्यायला किमान पदवीधर शिक्षण आवश्यक आहे. मग परत गेल्यावर मुक्त विद्यापीठात बीएसाठी प्रवेश घेतला. बीए पूर्ण झाल्यावर मग अहमदनगरला मास मीडियाला ॲडमिशन घेतलं. फार कमी लोकांना हे माहिती असेल, पण नागराज आणि भाऊराव एकाच कॉलेजात शिकले. अहमदनगरच्या न्यु आर्ट्स महाविद्यालयातून भाऊरावनं एकत्र मास कम्युनिकेशनचं शिक्षण घेतलं.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर भाऊराव त्याचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी निघाला. चित्रपट बनवायचा, मोठा दिग्दर्शक व्हायचं हेच ते स्वप्न. संपूर्ण बालपण गावात गेलेलं. त्यामुळे रोमारोमात भरलेलं गावपणच भाऊचं मुख्य हत्यार ठरलं. ख्वाडा हा भाऊरावचा ग्रामीण विषयाशी संबंधित पहिला




चित्रपट. जमीन विकून, मित्रांकडून पैसे उधार घेऊन भाऊनं ख्वाडा बनवला. या चित्रपटाला पुण्याच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. ही भाऊरावसाठी कौतुकाची थाप तर होतीच पण या पुरस्कारामुळं भाऊला नवी उमेद मिळाली आणि पुढे त्याने बबन साकारला. ख्वाडाप्रमाणेच बबनलाही प्रेक्षकांकडून दाद मिळाली. फक्त दोन चित्रपटातचं भाऊन भरघोस यश प्राप्त केलं. यानंतर आता २६ एप्रिलला TDM द्वारे भाऊ पुन्हा एकदा प्रेक्षकांना भेटायला येतोय.

स्थानिक सामाजिक प्रश्नांना सिनेमाच्या माध्यमातून वाचा फोडताना, भाऊनं आपल्या कलाकृतीतून प्रेक्षकांना अंतर्मुख व्हायला भाग पाडलं आहे. आज नागराजच्या खांद्याला खांदा लावून भाऊ मराठी चित्रपटसृष्टीला नव्या उंचीवर नेतोय. जरी दोघांची स्वप्न सारखीच असली, त्यांची काम करण्याची शैली, चित्रपटांचे विषय सारखेच असले, तरी एक बाब भाऊचं वेगळेपण दाखवते. ती म्हणजे, दिग्दर्शकाव्यतिरिक्त भाऊमध्ये लपलेला मार्गदर्शक..

एक वेळ अशी होती, जेव्हा चित्रपट हे त्यात दिसणारे नट आणि नटी मिळून बनवतात असं भाऊला वाटायचं. कदाचित हा असंमजस, चित्रपटांचं अपुरं ज्ञान असलेला भाऊ आजही खेडोपाड्यात असेल, असं त्याला वाटतं असावं. आणि तरुणांमधील हाच संभ्रम दूर व्हावा, त्यांना सिनेमांचं पूर्ण ज्ञान मिळावं म्हणून भाऊ नेहमी तरुण पिढीला मार्गदर्शन करताना दिसतो. नायक किंवा नायिका बनण्यासाठी काय करावं, अभिनयाव्यतिरिक्तही इतर अनेकं काम असतात, जी सिनेसृष्टीत केली जातात, ती कोणती, दिग्दर्शन, चित्रपट निर्मिती कशी केली जाते, अशा सिनेमांशी संबंधित नानाविध प्रश्नावर भाऊ बोलत असतो.

भाऊ नेहमीच वेळ काढून ग्रामीण भागातील तरुणाईला मार्गदर्शन करत असतो. विविध मंचांवरून तो तरुणाईसोबत अनेक विषयांवर बोलतो. शेतकरी बांधवांच्याप्रती त्याच्या मनात खूप जास्त प्रेम असल्याचे त्याच्या बोलण्यातून नेहमी जाणवते. अतिशय सोप्या - साध्या भाषेत तो संवाद साधत असल्याने त्याचे बोलणे तरुणाईच्या मनाचा ठाव घेते. शेतकरी बांधवांच्या व्यथा, वेदना भाऊने अतिशय जवळून पाहिल्या असून त्याच्या सिनेमात याचे प्रतिबिंब दिसते. भाउच्या सिनेमात नेहमीच शेतकरी हा केंद्रस्थानी असतो भाऊच्या चाहत्यांच्या संख्या मोठी असून त्याच्या याच गुणांमुळे तो तरुणाईच्या गळ्यातील ताईत बनला आहे. यामुळेच सिनेसृष्टीच्या क्षितिजावर असणारा भाऊराव कऱ्हाडे नावाचा तारा आपले अढळस्थान निर्माण करणार याबाबत कोणतीही शंका नाही.

# रजवाड्यांसमोर नवाब पडले फिके!

## राजस्थान रॉयल्सने सनरायजर्स हैदराबादचा 72 धावांनी उडवला धुव्वा

| हैदराबाद | महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**भारतीय संघाचा फिरकीपटू गोलंदाज युजवेंद्र चहलने इंडियन प्रीमिअर लीग २०२३ स्पर्धेत आपल्या फिरकीची जादू दाखवत हैदराबादला धूळ चारली. या सामन्यात दोन्ही संघ त्यांच्या काही प्रमुख खेळाडूंशिवाय खेळत होते. अशा स्थितीत दोन्ही संघांसमोर विजयाने स्पर्धेची सुरुवात करण्याचे मोठे आव्हान होते त्यात राजस्थानने बाजी मारली.**



राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळणाऱ्या चहलने आयपीएल २०२३ स्पर्धेचा पहिला सामना सनरायझर्स हैदराबाद संघाविरुद्ध खेळला गेला.राजस्थान रॉयल्सने सनरायजर्स हैदराबादवर तब्बल ७२ धावांनी दणदणीत विजय मिळवला. सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. राजस्थान रॉयल्सने सनरायझर्स हैदराबादसमोर २०४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र, हैदराबाद केवळ १३१ धावाच करू शकली.डोंगराएवढे मोठे असलेले आव्हान पार करताना हैदराबादची सुरुवात अतिशय खराब झाली. त्यांनी शून्यावर दोन विकेट्स गमावल्या. अभिषेक शर्मा आणि राहुल त्रिपाठी भोपळाही न फोडता माघारी परतले. ट्रेंट बोल्टने पहिल्याच षटकात त्यांना बाद करून हैदराबादला दुहेरी धक्का दिला. यानंतर युझवेंद्र चहलने हॅरी ब्रूकला बाद करून हैदराबादला तिसरा धक्का दिला. ब्रूकने १३ धावा केल्या.

यानंतर वॉशिंग्टन सुंदरही स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतला. अश्विनने ग्लेनला बाद केले, सलामीवीर मयांक अग्रवाल याने एक बाजू लावून धरण्याचा प्रयत्न केला मात्र २३ चेंडूत २७ धावा करून बाद झाला. भुवनेश्वर कुमारला बाद करून चहलने सामन्यातील चौथी विकेट पूर्ण केली. यानंतर अब्दुल समद आणि उमरान मलिक यांनी काही मोठे फटके मारले. मात्र संघाला पराभवाला सामोरे जावे लागले.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या राजस्थान रॉयल्स संघाला जॉस बटलर आणि यशस्वी जैस्वाल यांनी दणका दिला. दोघांमध्ये पहिल्या विकेटसाठी ८५ धावांची भागीदारी झाली. पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात जोस बटलर २२ चेंडूत ५४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर यशस्वी जैस्वालने कर्णधार संजू सॅमसनसोबत अर्धशतकी भागीदारी केली.

यशस्वी ३७ चेंडूत ५४ धावा करून बाद झाला. यानंतर देवदत्त पडिक्कलला उमरान मलिकने क्लीन बोल्ड केले. रियान पराग ७ धावा करून बाद झाला. हेटमायर आणि अश्विन यांच्यात सहाव्या विकेटसाठी ९ चेंडूत १६ धावांची भागीदारी झाली, ज्यामुळे राजस्थानच्या संघाला २०० चा टप्पा पार करता आला. हैदराबादकडून नटराजन आणि फारुखने प्रत्येकी दोन, तर उमरानला एक विकेट मिळाली.

# गुरुमाऊली स्पोर्ट्स पुरुष तृतीय गटात, आकांक्षा मंडळ कुमार गटात अंतिम विजेते

## अभिनव स्पोर्ट्स क्लब आयोजित कुमार व पुरुष तृतीय श्रेणी गट कबड्डी स्पर्धा - 2023.

| मुंबई | महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**अभिनव स्पोर्ट्स क्लबने आयोजित केलेल्या पुरुष तृतीय श्रेणी (स्थानिक) गटात गुरुमाऊली स्पोर्ट्स क्लबने, तर कुमार गटात आकांक्षा मंडळाने जेतेपद पटकाविले. माटुंगा पूर्व येथील नप्पू लखमशी मनोरंजन मैदानावर झालेल्या तृतीय श्रेणी गटात गुरुमाऊली स्पोर्ट्सने शिवनेरी स्पोर्ट्सचा ३७-२३ असा पराभव करीत अंतिम विजेतेपद मिळविले.**




पहिल्या डावात सावध सुरुवात करीत १३-०८ अशी आघाडी घेणाऱ्या गुरुमाऊलीने दुसऱ्या डावात मात्र जोशपूर्ण खेळ करीत १४ गुणांच्या फरकाने आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. गुरुप्रसाद धामणे, आशिष बडद यांच्या जोशपूर्ण चढाया, त्याला दिनेश धामणे यांनी भक्कम बचाव करीत दिलेली साथ यामुळे हा विजय शक्य झाला. शिवनेरीच्या रोहित आवळे, विनायक कोशगुडशा यांचा या सामन्यात प्रभाव पडला नाही.

कुमारांच्या अंतिम सामन्यात आकांक्षा मंडळाने अमर संदेश मंडळावर ३१-१८ अशी सहज मात करीत अंतिम विजेतेपदाला गवसणी घातली. पहिल्या सत्रात १७-१० अशी आघाडी घेणाऱ्या आकांक्षाने दुसऱ्या सत्रात देखील सावध खेळ करीत हा विजय साकारला. लवेश चिंबडे, स्वप्नील पवार यांच्या संयमी चढाया आणि उत्कर्ष पयर यांच्या आकर्षक पकडी यामुळे हा विजय शक्य झाला. अमर संदेशचे अतिश जयस्वार, सर्वेश पाल चमकले. या स्पर्धेचे बक्षिस वितरण नगरसेवक अमय घोले, पहिल्या महिला शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त चित्र नाबर-केरकर, मुंबई शहर कबड्डी असो. चे संयुक्त चिटणीस शरद कालांगण

# भारतीय क्रिकेट संघाचा रोमँटिक हिरो सलीम दुर्रानी यांचे निधन

## क्रिकेट क्षेत्रात पसरली शोककळा

| चेन्नई | महाईन्यूज | वृत्तसंस्था |



भारतीय क्रिकेट जगतासाठी रविवारी एक दु:खद बातमी समोर आली आहे. भारताचे माजी क्रिकेटपटू सलीम दुर्रानी यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. तो कॅन्सरशी झुंज देत होता. गुजरातमधील जामनगरमध्ये सलीम यांनी अखेरचा श्वास घेतला. सलीम दुर्रानी यांच्या निधनावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. अर्जुन पुरस्काराने सन्मानित होणारे ते पहिले क्रिकेटपटू होते. हा सन्मान त्यांना १९६० मध्ये मिळाला होता. सलीम दुर्रानी यांनी भारतासाठी २९ कसोटी खेळल्या, ज्यात त्यांनी एक शतक आणि सात अर्धशतकांच्या मदतीने १२०२ धावा केल्या. तसेच ७५ विकेट्स घेतल्या.

अफगाणिस्तान मध्ये जन्म

सलीम दुर्रानी यांचा जन्म ११ डिसेंबर १९३४ रोजी अफगाणिस्तानची राजधानी काबूल येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम अझीझ दुर्रानी होते. जन्मानंतर तो भारतात आला. त्याचे वडील अब्दुल अझीझ यांनी ऑस्ट्रेलियाविरुद्ध अविभाजित भारतासाठी दोन अनधिकृत कसोटी सामने खेळले. फाळणीनंतर त्यांचे वडील अब्दुल अझीझ क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कराचीला गेले तर सलीम दुर्रानी जामनगरमध्ये आईसोबत राहिले.